# रे.दि.मु.क्र.३१/२०१० मधील नि.१५४ वरील आदेश

(गुराप्पा घेज्ञी वगैरे वि. बाबु नागराळे वगैरे )

(CNR No.MHSN080002222010)

मूळ दाव्यातील प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज दोन अतिरिक्त मुद्दे काढण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द निरंतर ताकीदीकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या मालकीचे गट क्र.९०४ ची मोजणी दिनांक ०९.०४.२००९ रोजी मो.र.क्र.८७६ नुसार केली असून त्यामध्ये वादी यांनी प्रतिवादी यांचे क्षेत्रात ०.१०.५०आर क्षेत्राचे अतिक्रमण केलेचे स्पष्ट झाले आहे. त्याअनुषंगाने नि.६४ कडे मुद्दा निश्चित करणेत आलेला आहे. तथापी, प्रतिवादी यांनी नि.११६ कडे दाखल केलेला कोर्ट कमिशनर मार्फत मोजणीचा अर्ज मंजूर करणेत येवून त्याप्रमाणे नि.१४३ कडे कमिशन अहवाल दाखल आहे. सदर अहवालानुसार, वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे गट क्र.९०४ मध्ये पुर्वीपेक्षा अधिक म्हणजे ०.१२.५७ आर व प्रतिवादी क्र.६ यांनी ०.०२.७४ आर इतके क्षेत्र अतिक्रमण केलेचे दर्शविणेत आलेले आहे. त्यानुसार प्रतिवादी यांनी नि.३० कडे दाखल केलेल्या त्यांच्या कैफियत व प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती केलेली आहे. त्यामुळे, नि.६४ कडे अ.क्र.४ कडे निघालेला अतिक्रमीत क्षेत्राबाबतचा मुद्दा रद्द करुन खाली नमूद केल्याप्रमाणे दोन नवीन मुद्दे निश्चित करणेची विनंती केली आहे.

४. मूळ दाव्यातील वादी यांनी प्रतिदाव्यातील वादी क्र.१ ते ५ यांच्या कब्जेवहिवाटीच्या मिळकत गट क्र.९०४ मध्ये ०.१२.५७आर क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे काय?

५. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.६ यांनी प्रतिदाव्यातील वादी क्र.१ ते ५ यांचे कब्जेवहिवाटीच्या मिळकत गट क्र.९०४ मध्ये ०.०२.७४आर क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे काय?

२. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वरील नमूद कारणास्तव त्यांचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तूत अर्जास त्यांचे म्हणणे नि.१५५ कडे दाखल केले असून प्रतिवादी यांच्या अर्जातील सर्व कथने अमान्य केलेली आहेत. वादी यांच्या कथनानुसार, त्यांच्या

कब्जेवहिवाटीत असलेल्या गट क्र.९४४ व ९४५ या मिळकतीस प्रतिवादी यांनी कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये म्हणून निरंतर ताकीदीची मागणी त्यांनी मूळ दाव्याद्वारे केलेली आहे. तथापी, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी जो प्रतिदावा दाखल केलेला आहे तो गट क्र.९०४ या मिळकतीबाबत आहे. तो वादी यांच्या गट क्र.९४४ व ९४५ मिळकतीबाबत नाही. वादी यांनी दि.प्र.सं.आदेश ८ नियम ६-ग अन्वये अर्ज दाखल केलेला असून त्याचा निर्णय झाल्याशिवाय प्रस्तुतचा अर्ज निकाली करता येणार नाही. करिता, अर्ज तात्पुरत्या निर्णयाकरिता प्रलंबित ठेवणेची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी नि.१४३ कडे दाखल असलेल्या मोजणी अहवालाच्या आधारे दोन अतिरिक्त मुद्दे निश्चित करण्याची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने नि.१४३ कडील मोजणी अहवालाचे अवलोकन केले असता, अ,ब,क,ड या अद्याक्षराने दर्शविणेत आलेले ००.०२.७४ इतके क्षेत्र गट क्र.९०४ चे असून ते गट क्र.९४६ चे वहिवाटीस आल्याचे त्याचबरोबर, ड,क,ख,ग या अद्याक्षराने दर्शविणेत आलेले ००.१२.५७ इतके क्षेत्र गट क्र.९०४ चे असून ते गट क्र.९४५ चे वहिवाटीस असल्याचे नमूद केलेले आहे. तथापी, सदरची बाब प्रतिवादींना योग्य त्या कायदेशीर तरतुदींचा अवलंब करुन शाबीत करावी लागेल. सदर बाबीवर या घडीला कोणतेही भाष्य करणे योग्य होणार नाही. प्रतिवादी यांची नवीन मुद्दे निश्चित करण्याची मागणी संयुक्तिक वाटते.

६. त्याचबरोबर, वादी यांनी असा आक्षेप घेतला आहे की, त्यांनी दाखल केलेला दि.प्र.सं. आदेश ८ नियम ६-ग अन्वये अर्ज निर्णयीत झाल्याखेरीज प्रस्तुतचा अर्ज निकाली काढता येणार नाही. याअनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी सादर केलेला उपरोल्लीखित नि.१५८ कडील अर्ज दिनांक १२.११.२०२५ रोजी गुणावगुणावर निकाली काढणेत आलेला आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, प्रतिवादी क्र.१ ते ५ हे मागणी करीत असलेला अतिक्रमीत क्षेत्राचा मुद्दा हा वाद विषयाशी निगडीत ठरतो. त्याबाबतचे मुद्दे पुर्वी निश्चित करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे, अर्ज मंजुरीस पात्र ठरतो. त्याचबरोबर प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी नि.६४ कडे अ.क्र.३ हा दोन वेळेस टंकलिखित झालेला आहे असे नमूद केलेले आहे. त्यामुळे, सदरची त्रुटी दूर करणेकरिता, नि.६४ कडे पुर्वी निश्चित केलेले सर्व मुद्दे वगळणेत येत असून प्रतिवादी यांनी मागणी केलेल्या नवीन

मुद्दयासह पुर्वीचे मुद्दे पुन्हा निश्चित करणेत येत आहेत. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खालील नमूद केल्याप्रमाणे नि.६४ कडे नव्याने दोन मुद्दे निश्चित करणेत येत आहेत.

४. प्रतिदाव्यातील वादी (मूळ प्रतिवादी क्र.१ ते ५) हे सिध्द करतात काय की, मूळ दाव्यातील वादी यांनी त्यांच्या कब्जेवहिवाटीच्या मिळकत गट क्र.९०४ मध्ये ०.१२.५७आर क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे?

५. प्रतिदाव्यातील वादी (मूळ प्रतिवादी क्र.१ ते ५) हे सिध्द करतात काय की, प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.६ यांनी त्यांचे कब्जेवहिवाटीच्या मिळकत गट क्र.९०४ मध्ये ०.०२.७४आर क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे?

PRAKASH CHUNNI BACHHALE
Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.01.13 12:49:50 +0530

जत. (प्रकाश चु. बछले)

दिनांकः-०७.०१.२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, जत.